PDF Compressor Free Version

No. TST-1089/(3139)/D-XIII,
Housing and Special Assistance
Department,
Mantralaya, Bombay-400 032.

Dated the 30/12/1989

The Chairman,
Shree Jayendra Saraswati Sankaracharya Trust,
2/2 Garodia Shopping Centre,
149, Garodia Nagar, Ghatkopar,
Bombay-400 077.

Subject: Exemption under section 20 for transfer of land to Shri Jayendra Saraswati Sankaracharya Trust for the purpose of construction of school and college as per D.P. reservations.

---

Sir,

I am directed to state that the request made by the Trust for grant of exemption u/s. 20(1)(a) of the Urban Land Ceiling Act,1976 to enable it to purchase land admeasuring 3,935.87 sq.mtrs. (4235 sq.yds.) at S.No. 32, ~~120~~/pk 133/1pt, CTS No. 26, Ghatkopar(West) from M/s. Sharan Builders for the purpose of construction of College, Secondary School and Primary School as per D.P. reservations in furtherance of the aims and objects of the Trust has been approved in principle by Government of Maharashtra. This is, however, subject to the condition that either the Trust or the landholder shall pay to Government the price which the Revenue and Forest Department would have charged while allotting Government land for a similar purpose. Formal exemption order u/s. 20 shall be issued by Government after this amount is paid to Government.

2. The price shall be worked out by the Additional Collector, Bombay Suburban District, Bombay whose office is situated at Old Custom House, Fort, Bombay. You may contact

..2/-

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version


him for further necessary action in this regard.

3. Since the Trust desires to start the construction work immediately, it is hereby permitted to do so, subject its furnishing to Government an undertaking on Rs. 10/- sta paper that it shall pay the amount worked out by the Additional Collector, Bombay Suburban District, Bombay with a period of 90 days from the date when the figure is communicated to the Trust. Completion certificate shall not be granted by the Bombay Municipal Corporation without obtaini confermation from Competent Authority Bombay that the neccessary amount has been paid to Government.

Yours faithfully,

(Ashok Lal)
Deputy Secretary to Govt.

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version


# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

Ph.6556799, 6550111 Fax: 6556805 email address: collrmsd@yahoo.com


(567)

दिनांक : ९/१२/२००९

**वाचले :-**

१) शासन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडील पत्र क्र. टीएसटी १०८९/(३१३९)/डी-१३, दि.३१.१२.१९८९.

२) श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट यांचेकडील पत्र, दि. ६.१.२००६.

३) अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.क्षे.क.म.) बृहन्मुंबई यांचेकडील पत्र क्र. सी/युएलसी/डे-३/से-२०/सीस-२६/ घाटकोपर/तालुका कुर्ला, दि.२८.०९.२००६.

४) नगर विकास विभाग, मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. नाजकधा-१०/२००६/प्र.क्र.११४/ना.ज.क.धा.-१, दि.१२.१२.२००६.

५) या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या-२डी/३२/ई-१८७, दि.६.१.२००७ व दि.२०.११.२००९.

COLLECTOR OF (जिल्हाधिकारी) MUMBAI SUBURBAN DISTRICT मुंबई उपनगर जिल्हा

**क्र. सी/कार्या-२डी/जमिन/कावि-२४५/२००९**

**आदेश:-**

मौजे – घाटकोपर, ता. कुर्ला येथील सिटीएस नं.२६ पैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार शाळा व कॉलेजसाठी आरक्षित असलेली मे. शरन बिल्डर्स यांचेकडील ना.ज.क.धा.-कायदा, १९७३ चे कलम २०(१) अ अन्वये सूट मिळालेल्या ३९३५.८७ चौ.मी. जमिनीचा विकास करणेस श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट यांना गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडील दि.१३.१२.१९८९ चे पत्रान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.क्षे.क.म.), बृहन्मुंबई यांचेकडील दि.२८.०९.२००६ च्या पत्राप्रमाणे, मे. शरन बिल्डर्स यांनी महानगरपालिकेच्या विकास योजनेत सेकंडरी स्कूल व कॉलेजसाठी आरक्षित असलेले ३९३५.८७ चौ.मी. क्षेत्र श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्टला विकण्याचा करारनामा केलेला आहे. श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट सदरहू जागेचा वापर सेकंडरी स्कूल व कॉलेज ह्या आरक्षणाचे वापरासाठीच करणार असलेने महसूल व वनविभागाच्या प्रचलीत

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version



धोरणाप्रमाणे भोगवटा मुल्य आकारण्याच्या अटीवर सदर प्रस्तावास शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने सदरहू संस्थेला मे. शरण बिल्डर्सकडून जागा खरेदी करणेस ना.ज.क.धा. अधिनियम १९७६ चे कलम २० अंतर्गत तत्वत: मान्यता दिलेली आहे.

शासन महसूल व वनविभागाकडील निर्णय क्र. एलआरएफ-१०८३/१४९६/ प्र.क्र.३७००/ग-६, दि.११.०५.१९८४ प्रमाणे शासकीय जमीन सेकंडरी स्कूल व कॉलेज इ. प्रयोजनासाठी प्रदान करण्याकरिता त्या जागेचे दि.१.२.१९७६ या आधारभूत तारखेच्या मुल्यांकनाप्रमाणे येणा-या किंमतीच्या २५% इतके भोगवटा मुल्य आकारण्यात येते. त्याप्रमाणे भोगवटा मुल्य आकारून श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट या संस्थेस सदर मिळकत कब्जे हक्काने मंजूर करण्यास व सदर अतिरिक्त जमिनीवरील विकास आराखड्यातील आरक्षणाने बाधीत क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास करणेसाठी कलम-२० खाली परवानगी देण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये झाला असल्याने जमिनीची नियमानुसार होणारी कब्जेहक्काची रक्कम सन १९८९ पासूनच्या व्याजासह आकारण्याबाबते निर्देश नगर विकास विभागाचे पत्र क्र. नाजकधा-१०/२००६/प्र.क्र.११४/नाजकधा-१, दि.२१.१२.२००६ चे पत्रान्वये दिलेली आहेत.

श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट यांनी सदर जमिनीच्या सन १९७६ च्या बाजारमुल्याची तात्पुरती किंमत प्रति चौ.मी. रु.३०८/- प्रमाणे येणा-या किंमतीच्या २५% इतकी कब्जे हक्काची रक्कम रूपये ३,०३,०६२/- (तीन लक्ष तीन हजार बासष्ट रूपये मात्र) व त्यावरील व्याजाची रक्कम रूपये ४,११,१६६/- व रु.१,०४,४३०/- अशी एकूण रक्कम रू.८,१८,६५८/- (आठ लक्ष अठ्ठयान्नव हजार सहाशे अठ्ठावन्न रूपये मात्र पैकी रु.७,१४,२२८/- दि.२०.०८.२००९ रोजी व रू.१,०४,४३०/- दि.२९.११.२००९ चे 'पे' ऑर्डरने या कार्यालयात भरणा केलेली आहे. तसेच सदर जमिनीचे नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाने अंतिम मुल्यांकन केल्यानंतर येणारे अंतिम मुल्यांकन व तात्पुरते मुल्यांकनामधील फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरण्यास तयार असलेबाबतचे दि.२४.११.२००९ चे हमीपत्र सादर केले आहे.

श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट या संस्थेस सदर जमिन क्षेत्र ३१३५.८७ चौ.मी. सेकंडरी स्कूल व कॉलेजसाठी खालील अटी/शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे.

**अटी/शर्ती :-**

१) संस्थेन सदर जागेवर शैक्षणिक प्रयोजन विकसीत करण्यापूर्वी व्यास, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका लादतील त्या अटी / शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

२) सदर जागेवर शैक्षणिक प्रयोजन विकसीत करताना त्यासाठी सक्षम प्राधिका-याची मान्यता घ्यावी.

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version

३) शासन निर्णय महसूल व वनविभाग, क्रमांक एलआरएफ-१०८३/१४९६/ प्र.क्र.३७००/ग-६, दि.११.०५.१९८४ मधील तरतुदी अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक रहातील.

४) सदर जागेचा उपयोग शैक्षणिक प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कारणासाठी करता येणार नाही.

सही/-
जिल्हाधिकारी
मुं.उ.जिल्हा

प्रति,
चेअरमन,
श्री. जयेंद्र सरस्वती शंकराचार्य ट्रस्ट,
२/२, गरोडिया शॉपिंग सेन्टर,
१४१, गरोडिया नगर, घाटकोपर,
मुंबई - ४०० ०७७.

प्रतः

१) अवर सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना माहितीसाठी रवाना.

२) अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.क्षे.क.म.), बृहन्मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

४) तहसिलदार, कुर्ला यांचेकडे माहितीसाठी रवाना.

स्थळ प्रतीवर मा.
जिल्हाधिकारी यांची
सही असे

जिल्हाधिकारी
मुं.उ.जिल्हा करिता

Scanned by CamScanner